# महात्मा फुले युवा दलाकडून फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## डॉ. नंदकुमार पालवे व आरती पालवे दांपत्याचा राज्यस्तरीय सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणार्या व सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या दांपत्यांचा दरवर्षी सन्मान करण्याची परंपरा महात्मा फुले युवा दलाच्या वतीने जपली जाते.

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त दिल्या जाणार्या फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार सन २०२६ २७ साठी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील बेलखेड येथील सेवा संकल्प प्रतिष्ठानचे डॉ. नंदकुमार पालवे व सौ. आरती नंदकुमार पालवे या दांपत्याची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे यांनी दिली.

हा राज्यस्तरीय पुरस्कार दरवर्षी एका दांपत्याला दिला जातो. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, फुले पगडी, साडी-चोळी आणि ११,००० रुपये रोख असे आहे. पालवे दांपत्य गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील मानसिक रुग्णांसाठी कार्यरत आहे. रेल्वे स्थानके, धार्मिक स्थळे किंवा इतर ठिकाणी बेवारस अवस्थेत सोडून दिलेल्या मानसिक रुग्णांना शोधून त्यांच्यापर्यंत वैद्यकीय सेवा, समुपदेशन व उपचार पोहोचवण्याचे कार्य ते करतात. अनेक वेळा अशा रुग्णांची ओळख किंवा कुटुंब उपलब्ध नसते, तरीही त्यांना आधार देण्याचे काम हे दांपत्य सातत्याने करत आहे. याशिवाय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मानसिक रुग्णांची काळजी घेण्यास अडचणी येतात. अशा कुटुंबांना शिधा, समुपदेशन व आवश्यक मदत पुरवून रुग्णांना बेघर होण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न सेवा संकल्प प्रतिष्ठानमार्फत केला जातो.

# मैदान गाजवले, मनेही जिंकली; महसूल क्रीडा स्पर्धेत जालना जिल्ह्याचा डंका

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रत्यक्ष सहभागाने खेळाडूंमध्ये संचारले नवचैतन्य**

**टेबल टेनिसच्या मैदानात जिल्हाधिकाऱ्यांची फटकेबाजी ; जालन्याला सर्वसाधारण उपविजेतपद**

**'जबरदस्त है जिसका खेलना, वो है जिल्हा जालना' घोषणांनी दुमदुमले अश्वमेध मैदान**

**अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल सांघिक क्रीडा प्रकारात ठरले विजयी**





**जालना । प्रतिनिधी**

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अश्ववेध मैदानावर आयोजित 'छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा' जालन्याच्या अष्टपैलू कामगिरीने गाजली. दि.३ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत जालना जिल्ह्याने केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक कार्यक्रमातही बाजी मारत प्रेक्षक आणि परीक्षकांची मने जिंकली. रविवार दि.५ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरापर्यंत चाललेल्या पारितोषिक वितरण समारंभात जालना जिल्ह्याला विभागीय सर्वसाधारण चॅम्पियनशिपमध्ये द्वितीय उपविजेता म्हणून गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडून मैदानावर प्रोत्साहन- जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या स्पर्धेदरम्यान वेळोवेळी स्वतः मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढविला. त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे खेळाडूंमध्ये एक वेगळेच नवचैतन्य संचारले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या प्रोत्साहनामुळेच खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून विविध खेळांमध्ये विजयश्री खेचून आणला. या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा खेळातील प्रत्यक्ष सहभाग. केवळ मार्गदर्शक म्हणून न थांबता, जिल्हाधिकारी मित्तल स्वतः टेबल टेनिसच्या मैदानात उतरल्या. त्यांनी हाती बॅट घेत चपळाईने केलेले सर्व्हिस आणि स्मॅश पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांच्या या स्पोर्ट्समन स्पिरीटमुळे जालना संघातील खेळाडूंमध्ये वेगळेच नवचैतन्य निर्माण झाले. केवळ प्रशासकीय कामातच नव्हे, तर खेळाच्या मैदानातही आपण तितकेच तत्पर आहोत, हे त्यांनी टेबल टेनिसच्या स्पर्धेत उतरून दाखवून दिले. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच खेळाप्रती असलेली त्यांची ही ओढ खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरली. त्याच बरोबर जालना महसूल विभागातील अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल सांघिक क्रीडा प्रकारात विजयी ठरले असून त्यांनी स्पर्धेच्या कालावधीत सर्व संघ हाताळण्याचे काम नियोजनबध्द व कुशलपणे पार पाडले. तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील क्रीडा स्पर्धेत सहभाग घेत विजयाचा पाया रचला आहे.

सांस्कृतिक सादरीकरणाने जिंकली मने- केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक व्यासपीठावरही जालना जिल्ह्याने आपली छाप पाडली. सांस्कृतिक कार्यक्रमात जालन्याच्या चमूने सादर केलेल्या कलाविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या या कलागुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्याचा संघ या विभागीय क्रीडा स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत विविध स्पर्धा प्रकारात जालन्याचे नाव उंचावले आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व कलाकार, खेळाडूंचे कौतुक करत अभिनंदन केले.

# रमाईंच्या त्यागाची कहाणी ; नाटिकेने प्रेक्षकांना केले भावूक

## खुशबू मिसळेंनी नाटिकेतून मांडला रमाईंचा प्रेरणादायी प्रवास

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अफाट ज्ञानाचा साधा अंदाज लावणंही सामान्यांना शक्य नाही. मात्र त्या ज्ञानार्जनाच्या प्रवासामागे उभी असलेली शक्ती म्हणजे रामाई भिमराव आंबेडकर यांचे त्यागमय आणि संघर्षमय जीवन होय, असे सादरीकरण एका वादळाची सांगिनी:माता रमाई या नाटिकेतून खुशबू मिसळे यांनी सादर केले. त्यामुळे उपस्थित जनसमुदाय भावूक झाला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने दि.५ ते १४ एप्रिल या कालावधीत बीडमध्ये जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सोमवारी (दि.६) रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे एका वादळाची सांगिनी माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या संघर्षमयी जीवनावर खुशबू मिसळे यांनी एकपात्री नाटिका सादर केली. यावेळी पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, डॉ.पल्लवी पंडित, डॉ. सुनिता बारकुल, अलका डोंगरे, अस्मिता वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.



एकपात्री नाटिकेतून खुशबू

मिसळे यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनावर मार्मिक प्रकाश टाकला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणाच्या ध्यासाने परदेशात आणि देशात अभ्यास करत असताना त्यांना इतर कोणत्याही गोष्टींचा व्याप होऊ नये म्हणून रमाईंनी संसाराची संपूर्ण जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली होती. अत्यंत हालअपेष्टा सहन करत त्यांनी बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले, हे त्यांच्या जीवनातून स्पष्ट होते.

आज रमाई या केवळ बाबासाहेबांच्या पत्नी म्हणून नव्हे, तर आंबेडकरी समाजासह संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान बनल्या आहेत. त्यांच्या त्याग, संयम आणि समर्पणातून समाजाने प्रेरणा घ्यावी, असे आवाहन यावेळी नाटिकेतून खुशबू मिसळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिता पाटील, सूत्रसंचालन प्रसिध्द निवेदक महादेव इनकर, शितल पालके तर आभार किरण निसरगंध यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतीने मोलाचे योगदान दिले.

# अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य समिती मध्ये आम्रपाली साबळे यांची मराठवाडा उपाध्यक्षा महिला विभाग पदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य, या संघटनेची बैठक दि.०२/०४/२०२६ संपन्न झाली यावेळी अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष सौदागर महमदरफी यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष माधव मारकवाड यांनी निवड करुण त्यांना तसे नियुक्तीपत्र दिले.



महाराष्ट्रात माहिती अधिकार, मानवीहक्क, पत्रकार संरक्षण,भ्रष्टाचार निर्मुलन, ग्राहक संरक्षण, कायद्याचा प्रचार, प्रसार करण्यात येणार आहे, त्याच प्रमाणे नागरिकांना व शासकीय घटकांना माहिती अधिकाराचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पत्रकार व माहिती अधीकार कार्यकर्त्यांवर होणारे खोटे गुन्हे व हल्ले या बाबत संघटितपणे लोकशाही व सनदशीर मार्गाने लढा दिला जाऊन कार्यकर्त्यांचे संगठन तयार करून भ्रष्ट नोकरशाही चा माहिती अधिकार कायद्याचा वापर करून पर्दाफाश करणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, वैद्यकिय क्षेत्रात, सरकारी कामात भ्रष्टाचार होत असल्यास त्या विरुध्द तक्रार देऊन उपोषण, अंदोलन करू अशी माहीती संस्थापक अध्यक्ष सौदागर महमद रफी यांनी दिली. या निवडी बद्दल यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# महापुरुष वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी मांडले महापुरुषांचे विचार प्रभावीपणे



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मंगळवारी (ता.७) रोजी आयोजित करण्यात आलेली महापुरुष वकृत्व स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने दि.५ ते १४ कालावधी जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने मंगळवारी महापुरुष वकृत्व स्पर्धा पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संभाजी शिंदे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.वसंत ओगले, सचिन सोनवणे अण्णासाहेब शेळके, डी.जी.वानखेडे, अनिल विद्यागर अनिल डोळस, बाबासाहेब वाघमारे यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत महापुरुषांचे विचार आत्मसात करून जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद यांसारख्या महापुरुषांच्या जीवनकार्यावर प्रभावी व विचारप्रवर्तक भाषणे सादर केली. आपल्या ओजस्वी वक्तृत्वातून विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक व नैतिक मूल्यांचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचवला. स्पर्धे चे परीक्षण परीक्षक प्रा. लक्ष्मण गुंजाळ, प्रा.डॉ.शकील शेख, प्रा.डॉ.अनुप्रिता मोरे यांनी केले. स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर, विश्वभूषण सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बबन पंडित यांनी मानले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वकला विकसित होण्यासोबतच महापुरुषांविषयी आदर व प्रेरणा निर्माण झाली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेसाठी आज लॉटरी





**जालना । प्रतिनिधी**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय जालना यांच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राबविण्यात येत असलेल्या थेट कर्ज योजनेच्या लाभार्थ्यांची निवड आता लॉटरी पद्धतीने (चिठ्ठी टाकून) केली जाणार आहे. ही निवड प्रक्रिया बुधवार दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे पार पडणार आहे.

या आर्थिक वर्षासाठी जालना जिल्ह्याला एकूण २४ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. या योजनेसाठी महामंडळाकडे एकूण १६६ उमेदवारांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केले होते. अर्जांच्या छाननीनंतर त्यापैकी ११९ अर्जदार पात्र ठरले असून, ४७ अर्ज अपात्र ठरवण्यात आले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा लाभार्थी निवड समिती यांच्या अध्यक्षतेखाली ही लॉटरी प्रक्रिया राबविली जाईल. निवड प्रक्रियेत पूर्णतः पारदर्शकता राहावी यासाठी ही विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. महामंडळाच्या वतीने सर्व पात्र अर्जदारांना या निवड प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रक्रियेद्वारे पात्र ११९ उमेदवारांमधून चिठ्ठी टाकून अंतिम २४ लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे. असे जिल्हा व्यवस्थापक, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अनुदानाच्या लाभासाठी परभणी तहसिल कार्यालयाचे लाभार्थ्यांना आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी तालुक्यातील परभणी शहर भाग व परभणी ग्रामीण भागातील विशेष सहाय योजनेअंतर्गत विविध शासकीय योजनांचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांना कळविण्यात येते की, संजय गांधी निराधार अनुदान योजना/श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना, या सर्व लाभार्थी यांची परिपुर्ण माहिती डी.बी.टी. पोर्टलवर भरुन सर्व लाभार्थी यांना अनुदानाचा लाभ देण्याबाबत शासनाकडून कळविले आहे.

सदर डी.बी.टी. पोर्टलवर ज्या लाभार्थींचे आधार व्हेरीफिकेशन झाले नाही, त्यांना अनुदानाचा लाभ मिळणे बंद झाले आहे. अशा लाभार्थींनी आधार व्हेरीफिकेशन करणे करीता आधार आपडेट करुन आधारची ई प्रिंट, बँक पासबुकच्या झेरॉक्स प्रती, अदयावत मोबाईल क्रमांक, वर्गवारीप्रमाणे लाभ मंजुर झाला असेल त्यामध्ये दारिद्रयरेषा प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, अपंगाचे प्रमाणपत्र, विधवा महिलांसाठी पती मृत्यु दाखला, आजाराचे प्रमाणपत्र, लाभ मंजुरीचे आदेश नोटीस इ. कागदपत्रे परभणी तहसिल कार्यालयात सादर करावेत. सदर सर्व कागदपत्रे सादर करण्यासाठी लाभार्थ्यांना आठ दिवसांचा कालावधी देण्यात येत आहे. या कालावधीत सर्व शासकीय योजनांच्या लाभार्थींनी तात्काळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदरील कागदपत्र परभणी तहसिल कार्यालयामध्ये दि. ३०. एप्रिल २०२६ रोजी वेळ सांयकाळी ५.०० वा. पर्यंत जमा करावीत. कागदपत्रे जमा करण्यात आले नाही तर सदरील लाभार्थी यांचे नाव डी.बी.टी. पोर्टल वरून कमी करण्यात येईल. तरी सर्व लाभार्थी यांनी आपडेट असलेले आधार कार्ड व बँक पासबुक सजय गांधी विभाग, तहसिल कार्यालय, परभणी येथे जमा करावे, असे आवाहन तहसिलदार डॉ. संदिप राजपुरे यांनी केले आहे.

# अमृत संस्थेच्या वतीने बीड जिल्ह्यात लक्षित गटाचे परिवार सर्वेक्षण; ०८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत केले जाणार सर्वेक्षण

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी म्हणजे अमृत ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या योजना लक्ष्यित गटातील जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत पोहोचाव्यात यासाठी अमृत संस्थेकडून संपूर्ण महाराष्ट्रातील लक्ष्यित गटातील कुटुंबांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. बीड जिल्ह्यात हे अमृत परिवार सर्वेक्षण अभियान ०८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत राबवले जाणार आहे. खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना इतर कुठल्याही संस्था किंवा महामंडळे यांचा लाभ मिळत नाही, त्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल म्हणजेच कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी असलेल्या घटकांसाठी अमृत संस्था काम करते. अमृत संस्थेच्या लक्ष्यित गटात सध्या ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगुनथर, जाट, कानबी, कोमटी/वैश्य अशा २५ जातींचा समावेश आहे. (सर्वेक्षणाअंती यात वाढ होण्याची शक्यता आहे.) विद्यार्थी, तरुण, महिला, व्यावसायिक, शेतकरी अशा विविध घटकांसाठी संस्थेच्या विविध योजना आहेत. या योजना लक्ष्यित गटातील जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी परिवार सर्वेक्षण केले जाणार आहे. अमृत संस्थेमार्फत लक्ष्यित गटाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. यात मुख्यत्वे पुढील प्रकारच्या योजनांचा समावेश आहे. त्यात व्यक्तिमत्त्व विकास, औद्योगिक व उन्नत कौशल्यविकास, रोजगारक्षम कौशल्यविकास, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाह्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन, उद्योग/व्यवसायवृद्धीसाठी वैयक्तिक कर्ज व्याजपरतावा योजना आदींचा समावेश असून, लक्ष्यित गटाच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यवर्धित योजना सर्व घटकांतील व वयोगटांतील लाभार्थ्यांसाठी तयार करण्याचा मानस आहे. यासाठी लक्ष्यित गटातील कुटुंबाची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे, उपलब्ध स्थानिक संसाधने, उपलब्ध कौशल्य व आवडीनुसार विविध योजना तयार करण्यासाठी लक्ष्यित गटातील परिवाराचे सर्वेक्षण केले जाणार आहे. आवश्यकता वाटल्यास त्याचा कालावधी काही दिवसांसाठी वाढवण्यात येईल. या माध्यमातून लक्ष्यित गटातील जास्तीत जास्त कुटुंबांपर्यंत अमृत संस्थेच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच, अमृत संस्थेकडून सर्वांगीण विकासाच्या आणखी कोणकोणत्या योजना/उपक्रम राबवणे अपेक्षित आहे, याबद्दल विविध व्यक्तींची मते जाणून घेणे व त्या आधारावर नवीन आवश्यक योजना तयार करणे असा दुहेरी हेतू या सर्वेक्षणातून साध्य करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यामध्ये अमृत या संस्थेमार्फत वेळोवेळी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना/उपक्रम यांची माहिती वेळोवेळी सर्व संबंधितांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन अमृत संस्थेचे बीड जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी यांनी केले आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र


● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार दि. ०८ एप्रिल २०२६ ●



*बीड : वरवटी येथील देवस्थान धनाजीबाबा यांच्या यात्रेनिमित्त जंगी कुस्त्या चा कार्यक्रम असतो यावेळी कुस्ती लावताना वरवटी / आहेर धानोरा बीड येथील ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच श्री.बालासाहेब आबा इंगोले यांच्या सह ग्रामस्थ छायाचित्रात दिसत आहेत.*

## थोडक्यात...

### डॉ. गंगेश पटकूटवार यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी प्रा. डॉ. गंगेश लिंगराज पटकूटवार यांचे मंगळवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते ४८ वर्षांचे होते. डॉ. गंगेश पटकूटवार हे होमिओपॅथी फार्मसी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम पाहत होते. त्यांनी एम.डी. होमिओपॅथी या विषयात पदवी घेतली होती. त्या व्यतिरिक्त सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा सहभाग असायचा. त्यांच्या आकस्मिक जाण्याने महाविद्यालयाचे मोठे नुकसान झाले आहे. मंगळवारी त्यांना महाविद्यालयाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. अरुण भस्मे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.डॉ.गंगेश पटकूटवार यांच्या पाश्चात पत्नी दोन मुली, एक मुलगा, एक भाऊ असा परिवार आहे.

### तब्बल ९ वर्ष कॅन्सर'शी झुंज अखेर संपली

#### मुक्ता प्रदीप सोळंके यांचे दुःखद निधन



**माजलगांव । प्रतिनिधी**

येथील प्राध्यापक प्रदीप सोळंके यांच्या पत्नी मुक्ता प्रदीप सोळंके यांचे कॅन्सरच्या दुर्दम्य आजाराने दिनांक सहा एप्रिल २०२६ रोजी दुःखद निधन झाले तब्बल ९ वर्ष त्यांनी कॅन्सर सारख्या आजाराशी सामना केला परंतु अखेर त्यांची झुंज अपयशी ठरली त्यांच्यावर सात एप्रिल रोजी सादोळा या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. मुक्ता या २०१७ पासून सुरुवातीला ब्रेस्ट कॅन्सरने आजारी होते त्यानंतर त्यांना बोन्स कॅन्सरचे निदान झालेलं होतं. बोन्स कॅन्सर लिव्हर आणि लन्स शी संघर्ष करताना त्यांना शंभर रेडिशन तर ८० केमो व केमो घेताना दीड वर्ष केमो च्या गोळ्या एवढा संघर्ष त्यांनी केला परंतु ६ एप्रिल २०२६ रोजी रात्री साडेअकरा वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ७ एप्रिल रोजी सादोळा यामुळे गावी त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात पती प्रदीप सोळंके व दोन मुले आहेत. काँग्रेसचे नेते हरिभाऊ सोळंके यांच्या त्या लहान भाऊजई होत.

### ११ आणि १२ एप्रिल रोजी मुंबईत प्रगतिशील लेखक संघाचा दोन दिवसीय राष्ट्रीय सेमिनार

**बीड । प्रतिनिधी**

(परळ, मुंबई) येथे महात्मा फुले द्विजन्मशताब्दी आणि प्रगतिशील लेखक संघाच्या ९० व्या वर्धापन दिनाच्या औचित्याने परळ, मुंबई येथील राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या महात्मा गांधी सभागृहात दि. ११ आणि १२ एप्रिल २०२६ रोजी दोन दिवसांच्या राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी या जागेचे कॉम्रेड सज्जाद जाहीर साहित्यनगरी असे नामकरण करण्यात आले आहे. १९४३ मध्ये कॉम्रेड डांगे यांच्या पुढाकाराने मारवाडी मैदानात ८२ वर्षांपूर्वी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात प्रगतिशील लेखक संघाचे राष्ट्रीय अधिवेशन झाले होते. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाचे हे दुसरे अधिवेशन असणार आहे. प्रगतिशील लेखक संघाची स्थापना ९ एप्रिल १९३६ रोजी झाली. त्याला ९० वर्ष पूर्ण होत आहे. तसेच महान सुधारक, कवी, लेखक नाटककार महात्मा फुले यांचे देखील द्विजन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने 'सामाजिक न्यायाच्या लढाईत साहित्याचे महत्व' हा मध्यवर्ती विषय घेऊन मुंशी प्रेमचंद विचार मंचावर हे सेमिनार होणार आहे. ज्यामध्ये देशभरातील एकूण २५ राज्यातील ५० पेक्षा अधिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. हे प्रतिनिधी विविध विद्यापीठे, साहित्य संस्था, जन चळवळी, वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक मीडिया इत्यादींमध्ये प्रभावीपणे काम करत असून ते आपले शोधनिबंध सादर करतील. ११ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता कार्यक्रमाचे उद्घाटन माजी राज्यसभा अध्यक्ष, तथा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव कॉ. डी. राजा (केरळ) हे करणार आहेत. तर कार्यक्रमाची अध्यक्षता प्रगतिशील लेखक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पी. लक्ष्मीनारायणा (आंध्र प्रदेश) हे करतील. यावेळी महाराष्ट्र प्रगतिशील लेखक संघाचे अध्यक्ष जी. के. ऐनापुरे हे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतील.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिला अनुकंपा वारसांना न्याय



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये दिव्यांगाच्या ४८ विशेष शाळा कार्यरत आहेत. सदर शाळांमध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शासकीय सेवेत असताना मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती प्रदान करण्यासाठी शासन निर्णय चार जुलै २००९ मध्ये स्वयं स्पष्ट तरतुदी देण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय अनुकंपा नियुक्ती समिती जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे सदर समितीची बैठक आज ७ एप्रिल २०२६ रोजी पार पडली असून पाच वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती प्रदान करून जिल्हाधिकारी बीड श्री विवेक जॉन्सन यांनी न्यायिक भूमिका घेतलेली आहे. श्री संकेत बाळू मिसाळ यांना मतिमंद निवासी विद्यालय गेवराई येथील कलाशिक्षक या पदावर नियुक्ती प्रदान करण्यात आलेली आहे श्रीमती रोहिणी अशोक भंडारे यांना अभिनंदन येथे शिपाई पदावर तर सोनाली श्याम सोनवणे यांना काळजीवाहक या पदावर नियुक्ती प्रदान करण्यात आलेली आहे श्रीमती स्वाती संतोष राख यांना ज्ञानवर्धिनी मूकबधिर विद्यालय अंबाजोगाई या ठिकाणी स्वयंपाकी या पदावर नियुक्ती प्रदान करण्यात आलेली आहे श्रीमती अर्शिया मदर काजी यांना मानव विकास अपंग विद्यालय अंबाजोगाई येथे स्वयंपाकी या पदावर नियुक्ती प्रदान करण्यात आलेली आहे. या जिल्हास्तरीय समितीमध्ये माननीय जिल्हाधिकारी बीड यांनी अनुकंपा धारकांना नियुक्ती प्रदान करून त्यांच्या जीवनाला आधार दिलेला आहे आयुष्यात येणाऱ्या संकटांना देऊन त्यांचे जीवन सुखकर व्हावे या उद्देशाने माननीय जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या नियुक्तीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रिया राणी पाटील यांनी देखील सर्व नवनियुक्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून पुढील सेवेसाठी हार्दिक शुभेच्छा दिलेले आहेत.

# माजलगांवात भाजपा तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न; 'समाजकारणाला प्राधान्य'चा संदेश

**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगांव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे भारतीय जनता पार्टीच्या तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नव्या कार्यालयामुळे पक्षाच्या संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. हा कार्यक्रम दि. ६ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आला होता. या कार्यालयाचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण आबा राऊत होते. यावेळी भाजपचे प्रवक्ते राम कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब चोले, तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सचिव तथा नगरसेवक दीपक मेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती.







यावेळी ज्ञानेश्वर नाना मेंडके, शिवाजी राजवण, नितीन नाईकनवरे, डॉ. अशोक तिडके, दीपक मुंडे, अभय होके, ईश्वर खुरपे, हनुमान कदम, शरद कचरे, प्रदीप जाधवर, कल्याण शेप, सचिन तौर, सिद्धेश्वर राठोड दत्ता महाजन, बाळासाहेब क्षीरसागर, सुभाष साळवे,आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना शंकर देशमुख यांनी माजलगाव तालुक्यात भाजपची ताकद वाढत असल्याचे सांगितले. नव्या कार्यालयामुळे कार्यकर्त्यांना एकत्र येऊन अधिक प्रभावीपणे काम करता येईल. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी नमूद केले.

प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास उलगडला. जनसंघाच्या स्थापनेपासून ते आजच्या सशक्त भाजपा पर्यंतचा इतिहास त्यांनी स्पष्ट केला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या बलिदानाचा उल्लेख करत कलम ३७० विरोधातील भूमिका, तसेच २०१४ नंतर देशात झालेला बदल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची वाढ यावर त्यांनी प्रकाश टाकला. भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकारण करणारी संस्था नसून समाजकारणाला प्राधान्य देणारी संघटना आहे. या कार्यालयामध्ये ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण झाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच कार्यकर्त्यांनी पद-प्रतिष्ठेपेक्षा पक्षविचार, निष्ठा आणि जनसेवा यांना महत्त्व द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात इतर मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. उद्घाटनानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, किट्टी आडगाव मंडळ अध्यक्ष रुपाली कचरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन रुपाली कचरे यांनी मानले.

## माजलगावात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्याचे आवाहन : संतोष रासवे



**माजलगांव । प्रतिनिधी**

समाजसुधारक, शिक्षणप्रणेते व शेतकरी हितचिंतक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ११ एप्रिल रोजी शिवाजी महाराज चौक येथे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते संतोष रासवे यांनी केले आहे. महात्मा फुले यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिव्यवस्था व अन्यायाविरुद्ध लढा देत शिक्षणाचा प्रसार केला. विशेषतः महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी घेतलेली पुढाकार ऐतिहासिक ठरली आहे. त्यांच्या कार्याची आठवण ठेवत आणि त्यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी दरवर्षी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.

यंदाही माजलगाव येथे विविध कार्यक्रमांची रूपरेषा आखण्यात आली आहे. शिवाजी महाराज चौक येथे सकाळी पुष्पहार अर्पण, अभिवादन तसेच सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांच्या जयंतीचा दिवस प्रेरणादायी ठरतो. त्यामुळे सर्व नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन महापुरुषांना अभिवादन करावे, असे त्यांनी आवाहन केले. माजलगावकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



*बीड जिल्हा पोलीस दलातील अंमलदार श्री कल्याण औटे , अशोक नलावडे, मोहन क्षीरसागर यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती होऊन त्यांची संभाजीनगर परिक्षेत्रात नियुक्ती झाल्यामुळे माननीय पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉवत साहेब तसेच पोलीस निरीक्षक श्री मुकुंद कुलकर्णी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.*

# आदित्य डेंटल कॉलेजची यशाची परंपरा कायम; बीडीएस परीक्षेत विद्यार्थ्यांचा डंका

## तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के ; नेहा निनायडे, अंजली पालवे आणि दिशा अजपुंजे कॉलेजमध्ये प्रथम

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील आदित्य डेंटल कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या विद्यापीठ परीक्षांचे आयोजन मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात यशस्वीपणे पार पडले. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांनी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीची परंपरा कायम ठेवली आहे. विशेष म्हणजे तृतीय वर्ष बीडीएसचा निकाल १०० टक्के लागला. नेहा निनायडे, अंजली पालवे आणि दिशा अजपुंजे यांनी कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी विद्यार्थ्यांचे अभीनंदन केले. सर्व वर्षांतील निकाल अत्यंत समाधानकारक राहिला आहे. द्वितीय वर्ष बीडीएसचा निकाल ९५.७८ टक्के लागला. तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला. अंतिम वर्षाचा निकाल ८९.९१ टक्के लागला आहे. यामध्ये द्वितीय वर्ष: नेहा निनायडे (प्रथम- ५८८ गुण), नेहा मिरकुटे (द्वितीय), अश्विनी महाजन (तृतीय), तृतीय वर्ष: अंजली पालवे (प्रथम- ४२४ गुण), जान्हवी माळी (द्वितीय), शरवरी लोखंडे (तृतीय), अंतिम वर्ष: दिशा अजपुंजे (प्रथम- ११०५ गुण), भक्ती सांखे (द्वितीय), कमल तनवाडे (तृतीय) गुण मिळाले आहेत.

आरोग्य क्षेत्रात विद्यार्थ्यांनी नाव कमवावे

विद्यार्थ्यांनी यापुढेही आपले कौशल्य सिद्ध करत आरोग्य क्षेत्रात नाव कमवावे. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. -सुभाषचंद्रजी सारडा (संस्थापक अध्यक्ष, आदित्य एज्युकेशन ग्रुप)

शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि महाविद्यालयातील सकारात्मक शैक्षणिक वातावरणामुळेच हे यश साध्य झाले आहे. सर्व गुणवंतांचे अभिनंदन. -डॉ. आदिती सारडा (संचालिका, आदित्य शिक्षण संस्था)